N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण) **P.S.(ठाणे):** वैजापूर
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0614 **Year (वर्ष):** 2024
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 04/10/2024 23:42

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** शुक्रवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 04/10/2024
**Date To ( दिनांक पर्यंत):** 04/10/2024
**Time From (वेळेपासून):** 14:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 14:30 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 04/10/2024 **Time (वेळ):** 23:27 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 036
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 04/10/2024 23:27 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती वैजापुर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):** वैजापूर
**District(State) (जिल्हा(राज्य)):** छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण)(महाराष्ट्र)



CamScanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** गणेश रमेश तांबे
(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**
(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985
(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत
(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**
(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**
**Date of Issue (दिल्याची तारीख):**
**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | शहाजतपुर ता वैजापुर,वैजापूर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | शहाजतपुर ता वैजापुर,वैजापूर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**
(j) **Phone number (फोन नं.):**
**Mobile (मोबाइल नं.):** 91-9763222269

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अनिल सुनिल चव्हाण | | | 1. मुळरावार्ड नं 01,इसोली बुलढाना,पंचायत समिती वैजापुर मागील बाज़,महाराणा प्रताप चौक वैजापुर ,वैजापूर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र, भारत |
| 2 | अनंता सुर्यभान बुट्टे | | | 1. रा लक्ष्मी कलनी गंगापुर ,जि छसंभाजीनगर ,वैजापूर,छत्रपती संभाजीनगर(ग्रामीण),महाराष्ट्र, |



CamScanner

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 20,000/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 20,000.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | साक्षीदार याचे कडुन स्विकारलेली प्रत्येकी 10,000/ रुपये प्रमाणे एकुण रक्कम 20,000 | 20,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

40,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी गणेश रमेश तांबे वय 39 वर्ष, व्यवसाय – शेती रा. शहाजतपुर ता. वैजापुर जि. छत्रपती संभाजीनगर मोबाईल क्रमांक 9763222269 मेल आयडी - समक्ष हजर राहुन फिर्याद देतो की, दिनांक- 01.10.2024 रोजी मी ॲन्टी करप्शन ब्युरो पोलीस अधिक्षक कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे फोन करुन मला एक लोकसेवक लाचेची मागणी करत असल्याबाबत सांगुन मला त्या लोकसेवका विरुध्द तक्रार दयायची असलेबाबत सांगीतले. त्यावेळी त्यांनी मला आमचे कडील एक अधिकारी तुम्हाला फोन करतील असे सांगीतले. त्यानंतर माझा मोबाईल नंबर वरती ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस निरिक्षक श्री. शंकर मुटेकर यांनी त्यांचे मोबाईल नंबर वरुन फोन केला. त्यावेळी मी त्यांना मला एक लोकसेवक लाचेची मागणी करत असल्याबाबत सांगुन त्यांना माझी तक्रार घेण्यासाठी आमचे गावाजवळील लासुरगाव फाटा या ठिकाणी येण्यास सांगीतले. त्यानंतर मी सांगीतलेल्या ठिकाणी पोलीस निरिक्षक श्री. शंकर मुटेकर हे त्यांचे पथकासह आले. त्या ठिकाणी मी माझी पत्नी सौ. प्रियंका हिचे सोबत हजर होतो. त्यावेळी मी दोन शासकीय पंचासमक्ष पोलीस निरीक्षक, श्री.मुटकेर यांचेकडे लेखी तक्रार दिली होती की,मी वरील ठिकाणी माझी पत्नी सौ. प्रियंका व मुली यांच्या सोबत राहण्यास आहे. माझी पत्नी प्रियंका ही अंगणवाडी शहाजतपुर ता. वैजापुर येथे अंगणवाडी मदतनिस म्हणुन सण 2015 रोजी पासुन काम करत आहे. पत्नी प्रियंका हिचे शासकीय रेकॉर्डवरती प्रियंका लक्ष्मण साबळे असे तिचे माहेरकडील नाव आहे. पत्नी प्रियंका हिचे दिनांक 17.03.2023 रोजी अंगणवाडी सेविका या पदावर प्रमोशन झाले होते परंतु मा. हायकोर्ट मुंबई यांनी राज्यातील सर्व अंगणवाडी सेविका पदाच्या प्रमोश वरती स्टे दिल्यामुळे पत्नी प्रियंका हिचे अंगणवाडी सेविका म्हणुन प्रमोशन झाले नाही.

दिनांक 03.09.2024 रोजी अंगणवाडी सेविका पदोन्नतीचा स्टे मुंबई उच्च न्यायालय यांनी उठविला व नियमितपणे अंगणवाडी मदतनीस यांना अंगणवाडी सेविका म्हणुन पदोन्नती देण्यास सांगीतले आहे. त्यामुळे दिनांक 30.09.2024 रोजी माझी पत्नी प्रियंका हिचे अंगणवाडी सेविका प्रमोशन बाबत चर्चा करण्यासाठी मी व पत्नी प्रियंका असे पंचायत समिती वैजापुर येथील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयात श्री. अनिल चव्हाण साहेब, बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना कार्यालय वैजापुर यांना त्यांच्या कार्यालयात भेटलो. त्यावेळी कार्यालयात पालखेडच्या अंगणवाडी मदतनिस श्रीमती शिवकन्या मुलमुले व त्यांचे पती तसेच जळगाव येथील अंगणवाडी सेविका मदतनीस नंदा घेर हे हजर होते. त्यावेळी मला श्री.अनिल चव्हाण साहेब यांनी

मला तुमची पत्नी प्रियंका यांना अंगणवाडी सेविका या पदावर प्रमोशन देण्यासाठी तुम्हाला मला पन्नास हजार ( 50,000/-) रुपये दयावे लागतील. तुम्ही जर मी सांगीतले त्या प्रमाणे पैसे दिले नाही तर तुमच्या पत्नीला शहाजतपुर येथे अंगणवाडी सेविका या पदावरती वेळेवरती प्रमोशन देणार नाही असे म्हणाले. त्यावेळी कार्यालयात हजर असलेले शिपाई श्री. अनंत बुट्टे हे मला व माझ्या पत्नीला म्हणाले की, साहेब म्हणतेत ते पैसे देउन टाका बाकी काय असेल ते मी मॅनेज करतो असे म्हणाले. त्या वेळी आम्हाला त्यांना पैसे देण्याची इच्छा नसल्यामुळे काहीएक न बोलता साहेबांच्या केबिन मधुन बाहेर आलो. त्यावेळी अनंत बुट्टे हे चव्हाण साहेबांच्या केबीन मधुन आमच्याकडे आले व म्हणाले की, उदया या आपण काहीतरी कमी जास्त करुन घेउ साहेब सांगतील त्या प्रमाणे पैसे देउन टाका. तुम्ही जर साहेबांना पैसे दिले नाहीत तर साहेब तुमचे काम करणार नाहीत असे म्हणाले. त्यावेळी आम्ही पाहतो उदया येउन तुम्हाला भेटतो असे म्हणालो व तेथुन आम्ही घरी आलो. आमच्या मध्ये व श्री.अनिल चव्हाण साहेब, बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मिक बाल विकास सेवा योजना वैजापुर व त्यांचे कार्यालयातील शिपाई श्री. अनंत बुट्टे यांच्या मध्ये पैशाबाबत कोणताही उसनवारीचा अथवा आर्थिक देवाण घेवाणीचा व्यवहार झालेला नाही.
आज दिनांक 01.10.2024 रोजी मी व माझी पत्नी सौ. प्रियंका तांबे असे आम्ही दोघे पंचायत समिती वैजापुर येथील बालविकास प्रकल्प अधिकारी कार्यालय येथे जावुन श्री.अनिल चव्हाण साहेब, बाल विकास प्रकल्प अधिकारी वैजापुर व त्यांच्या कार्यालयातील शिपाई श्री.अनंत बुट्टे यांची भेट घेणार आहे व प्रियंका हिचे अंगणवाडी सेविका या पदाच्या प्रमोशन बाबत चर्चा करणार आहे. त्या वेळी पत्नीच्या प्रमोशन साठी श्री. अनिल चव्हाण साहेब व शिपाई अनंत बुट्टे यांनी स्वत अथवा इतरामार्फत पैशाची मागणी केल्यास त्यांच्या वरती कायदेशीर कारवाई करावी म्हणुन तक्रार देत आहे.

अशी लेखी तक्रार दिली. त्यासोबत मी माझी पत्नी प्रियंका लक्ष्मण साबळे हिस दिनांक 17.03.2023 रोजी अंगणवाडी केंद्र शहाजतपुर मदतनीस वरुन अंगवाडी सेविका या पदावरती प्रमोशन मिळालेल्या आदेशाची छायांकीत प्रत, बाल विकास प्रकल्प अधिकारी, एकात्मीक बाल विकास सेवा योजना वैजापुर यांना दिनांक 16.05.2015 रोजी अंगणावाडी केंद्र शहाजतपूर येथील मदतनीस पदासाठी केलेल्या अर्जाची छायांकीत प्रत, पत्नी प्रियंका लक्ष्मण साबळे हिचे MS-CIT, SSC, HSC, BSC, B.ED चे मार्कलिस्ट या कागदपत्रांच्या छायांकीत प्रती दिल्या. त्यानंतर मी दिलेली तक्रार खरी आहे काय ? याची खात्री व पडताळणी करण्यासाठी माझ्याकडे व्हाईस रेकॉर्डर देवून मला पंच क्र. 01 श्री. गजेंद्र काकडे यांचे सोबत एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय वैजापुर येथील श्री.अनिल चव्हाण, बाल विकास प्रकल्प अधिकारी वैजापुर व त्यांचे कार्यालयातील शिपाई श्री.अनंत बुट्टे यांची भेट घेण्यास पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर आम्ही लासुरगाव फाटा ता. वैजापुर जि. छ.संभाजीनगर येथुन एकात्मीक बालविकास प्रकल्प कार्यालय वैजापुर येथे श्री.अनिल चव्हाण, बाल विकास प्रकल्प अधिकारी वैजापुर व त्यांचे कार्यालयातील शिपाई श्री.अनंत बुट्टे यांची भेट घेण्यासाठी निघालो. त्यावेळी मी माझे मोटर सायकल वरती व पत्नी प्रियंका हि तिचे जवळील स्कुटी वरती आणि पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर हे त्यांचे पथकासह शासकीय वाहनाने निघुन लासुरगाव फाटा येथुन पिंपळगाव- शिवराई, किडीवाडी मार्गे वैजापुर शहरातील कोर्टाजवळील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानावरील सुरक्षित ठिकाणी पोहचलो.

त्यानंतर माझ्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी पोलीस निरीक्षक श्री.मुटेकर यांनी सोबत आणलेल्या साहीत्यातून एक नवीन मेमरी कार्ड काढुन डीजीटल व्हाईस रेकॅार्डर मशिन मध्ये टाकले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डींग चालु करुन व्हाईस रेकॉर्डींग मशिन कोणालाही दिसणार नाही अशा रितीने माझ्या बनियनला आतील बाजुस बांधली. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री. काकडे असे आम्ही दोघे जण माझ्या मोटार सायकलने पंचायत समिती वैजापुर येथील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय येथे श्री.अनिल चव्हाण, बाल विकास प्रकल्प अधिकारी वैजापुर व त्यांचे कार्यालयातील शिपाई श्री.अनंत बुट्टे यांची भेट घेण्यासाठी गेलो. त्यावेळी मला कार्यालयात शिपाई श्री. अनंत बुट्टे हे भेटले. त्यावेळी आमचे पंचासमक्ष बोलणे झाले. त्यावेळी मला लोकसेवक श्री. अनंत बुट्टे म्हणाले की, तुम्ही आयका गडया ते सरांच्या हिशोबानंच होईल माहीत है मव्ह सारख काय सांगल फक्त एकच सल्ला देउ शकतो ते आसल ते करुन घे संपला विषय याच्या पैक्षा काय वेगळ बोलु. त्यावेळी मी म्हणालो की, बोललो नं तुम्हाला मी बोलणं झाल नं. त्यावेळी लोकसेवक श्री. अनंत बुट्टे म्हणाले की, बोलले का तुम्ही थोडं थांबा मला बोलायत त्याला ते घरच्याला काय म्हणले. त्यावेळी मी म्हणालो की, नाही नाही ऐका तुम्ही याच्यामुळं आमचे दोन वर्ष वाया गेलं. त्यावेळी लोकसेवक श्री.अनंत बुट्टे म्हणाले की, तुम्ही थांबा नं गडबड करु नका नं होईल न सगळ.सरांना विनंती करा त्यांच काय असेल ते बायाला पाहुच नका पुन्हा याला त्याला सल्ला. मी त्यांना कन्व्हेन्स करतो टेक्शन घेवु नका तुम्ही. त्यावेळी मी म्हणालो की, आम्ही कधी भेटाव. त्यावेळी लोकसेवक श्री. अनंत बुट्टे मला म्हणाले की, परवा दिशी या चक्कर मारा उदया सुट्टी हय नं. परवा येतीन नं ते असे म्हणुन दिनांक 03.10.2024 रोजी भेटण्यास बोलविले असल्याने त्या दिवशी कारवाई स्थगीत करुन तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला.



CamScanner

त्यावरुन दिनांक 03.10.2024 रोजी आम्ही साई मंगल कार्यालय वैजापुर येथील गोपनिय ठिकाणी आल्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. मुटेकर यांनी सोबत आणलेल्या साहीत्यातून एक नवीन मेमरी कार्ड काढुन डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मशिन मध्ये टाकले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डीग चालु करुन व्हाईस रेकॉर्डीग मशिन कोणालाही दिसणार नाही अशा रितीने माझ्या बनियनला आतील बाजुस बांधली. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री. काकडे असे आम्ही दोघे जण माझ्या मोटार सायकलने पंचायत समिती वैजापुर येथील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय येथे श्री.अनिल चव्हाण, बाल विकास प्रकल्प अधिकारी वैजापुर व त्यांचे कार्यालयातील शिपाई श्री.अनंत बुट्टे यांची भेट घेण्यासाठी गेलो. त्या ठिकाणी गेल्यानंतर मी पंचासमक्ष लोकसेवक श्री.अनंत बुट्टे यांना भेटलो. त्यावेळी मला लोकसेवक श्री. अनंत बुट्टे म्हणाले की, खरी गोष्ट ही पण सिस्टीम मध्ये बसते पण सगळ्यांना सारखेच दयावे लागते. रुपया दोन पाच इकड का तिकड म्हणायच नाही. मी ऐवढे देतो न तेवढे देतो असे म्हणाले. त्यावेळी मी त्यांना म्हणालो की, कस हय सगळ्यांना सारखच हय, पाच .. पाच कमी करा असे म्हणालो. मी लोकसेवक श्री. अनंत बुट्टे यांच्या सोबत बोलत असताना ते मला म्हणाले की, तस नसतना पैसे थोडी तुम्ही आज बोलुन घ्याना. तुम्ही जवा भेटेल तवा बोलुन घ्यायच अस थोडच असत जेव्हा भेटल तवा बोलुन घ्यायच आणी लगेच झटपट जिकड तिकड एस म्हणल की लगेच घंटा भरात जिकड तिकड करुन टाकायच असे म्हणाले होते. त्या दिवशी श्री.अनिल चव्हाण, बाल विकास प्रकल्प अधिकारी वैजापुर हे मिटिंग कामी छत्रपती संभाजीनगर येथे गेले असल्यामुळे त्यांची लाचमागणी बाबत पडताळणी करता आली नव्हती म्हणून त्या दिवशी कारवाई स्थगित करुन तसा सविस्तर पंचनामा करण्यात आला. त्यानंतर दिनांक 04.10.2024 रोजी आम्ही साई मंगल कार्यालय वैजापुर येथील गोपनिय ठिकाणी आलो. दिनांक 03.10.2024 रोजी माझे सोबत पंच म्हणुन श्री. काकडे हे आले होते. त्यांचे कडे लोकसेवक श्री. अनंत बुट्टे यांनी संशयाने पाहुन हे कोण आहेत असे मला विचारले होते. त्यामुळे पोलीस निरिक्षक श्री. मुटेकर यांनी लोकसेवक श्री. अनंत बुट्टे यांना पंच क्रमांक 01 श्री. काकडे यांचेवरती संशय आला असल्याने आज रोजी लाचमागणी पडताळणी चे वेळी माझे सोबत पंच क्रमांक 01 चे काम करण्यासाठी श्री. अरुण गेडाम यांना सांगीतले. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. मुटेकर यांनी सोबत आणलेल्या साहीत्यातून एक नवीन मेमरी कार्ड काढुन डीजीटल व्हाईस रेकॉर्डर मशिन मध्ये टाकले. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डीग चालु करुन व्हाईस रेकॉर्डीग मशिन कोणालाही दिसणार नाही अशा रितीने माझ्या बनियनला आतील बाजुस बांधली. त्यानंतर मी व पंच क्र. 01 श्री. अरुण गेडाम असे आम्ही दोघे जण माझ्या मोटार सायकलने पंचायत समिती वैजापुर येथील एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालय येथे श्री.अनिल चव्हाण, बाल विकास प्रकल्प अधिकारी वैजापुर व त्यांचे कार्यालयातील शिपाई श्री.अनंत बुट्टे यांची भेट घेण्यासाठी गेलो. त्यावेळी पंचायत समिती वैजापुर येथे श्री. ज्ञानेश्वर मुलमुले हे त्यांची पत्नी शिवकन्या मुलमुले याचे अंगणवाडी सेविका म्हणुन पालखेड येथे प्रमोशन करणेबाबत तसेच श्री. विशाल काळुखे हे त्यांची आई नंदा घेर यांचे अंगणवाडी सेविका म्हणुन जळगाव येथे प्रमोशन करणेबाबत श्री.अनिल चव्हाण साहेब, बाल विकास प्रकल्प अधिकारी वैजापुर यांची भेट घेण्यासाठी आले होते. त्यावेळी मी, ज्ञानेश्वर मुलमुल व अनिल काळुखे असे पंच श्री. गेडाम यांचे समक्ष श्री.अनिल चव्हाण साहेब, बाल विकास प्रकल्प अधिकारी वैजापुर यांना भेटण्यासाठी त्यांचे कार्यालयात गेलो. (CCTNS प्रणाली मध्ये शब्द संख्या अपुरी पडत असल्याने पुढील फिर्याद सोबत जोडली आहे )

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** **(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Shamsundar Ramchandra Kauthale(I (Inspector)) / PI **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Ganesh Tambe

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पोलीस ठाणे वैजापुर
छत्रपती संभाजीनगर ग्रामीण

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Shamsundar Ramch
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI



CamScanner